म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २७३४



REFBK-0023325
REFBK-0023325

# वढाळ

मंगेश पाडगांवकर

सदर्भ कोश्य

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

13 DEC 1981
18 APR 1982
21 APR 1982
25 APR 1982
12 SEP 1982
12 SEP 1984
9 DEC 1984
5 JUN 1988
19 MAY 1990
16 MAY 1992

( क्रु. मा. प. )
५०००-४-८०

ग
ज़
ल

००

ग
झ
ल

००

# ग
# झ
# ल

०० मंगेश पाडगांवकर

संदर्भ
काव्य
२४३४
23325
८१९९१८

REFBK-0023325
REFBK-0023325

मौज प्रकाशन गृह

ग
झ
ल

०० मौज प्रकाशन : २८७

पहिली आवृत्ती : १० मार्च १९८१

© १९८१, मंगेश पाडगांवकर

मुखपृष्ठ : वासंती मुझुमदार

छायाचित्र : जया दडकर

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी
मुंबई ४०० ००४

प्रकाशक
श्री० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी
मुंबई ४०० ००४

किंमत सतरा रुपये पन्नास पैसे

५३ आणि ५४ या क्रमांकांचे गझल
'सलाम' या संग्रहातून घेतले आहेत.

गझल ३२, ओळ ८ : 'गाझ्या' ऐवजी
'माझ्या' वाचावे.

ग
झ
ल

०० डॉ० अजित आणि डॉ० सौ० कमल,
अभय,
श्री० दिलीप आणि सौ० अंजली,
रैना दिलीप कुळकर्णी
यांच्यासह सौ० यशोदा :
सर्वांना प्रेमपूर्वक.

ग
ज़
ल

००

ग
झ
ल

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
23324
काव्य
1991
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

०१

कोलाहलात साऱ्या माणूस शोधतो मी
गर्दीत माणसांच्या माणूस शोधतो मी

हे धर्म, देवळे ही धुंडून सर्व आलो
भिंतीपल्याड त्यांच्या माणूस शोधतो मी

हव्यास हा सुखाचा, कल्लोळ वासनांचा
जळत्या चितेवरी या माणूस शोधतो मी

फासून रंग रात्री दिवसा भकास सारे
खिडकीत विक्रयाच्या माणूस शोधतो मी

काळ्या उभ्या तिजोऱ्या गाणे खरीदणाऱ्या
येथे जित्या गळ्याचा माणूस शोधतो मी

त्वेषात बाहुल्यांचे जाती जथे पुढे हे
कळसूत्र तोडुनी हे माणूस शोधतो मी

या झोपड्यांत आली वाहून ही गटारे
चिखलात हुंदक्यांच्या माणूस शोधतो मी

या संस्कृतीस साऱ्या ही चूड लाविली मी
वणव्यात पेटलेल्या माणूस शोधतो मी

ग
झ
ल

०२ खिन्न या वाटा दूर पळणाऱ्या
या स्मृती साऱ्या जीव छळणाऱ्या

लाडक्या शपथा, लाजरी वचने
पाकळ्या त्यांच्या आज गळणाऱ्या

रात्र वैरिण ही सात जन्मांची
आणि या उल्का तोल ढळणाऱ्या

चांदण्याकाठी धुंद त्या भेटी
या व्यथा उरल्या आज जळणाऱ्या

०३ भाव माझ्या अंतरीचे एकदा कळतील सारे
दूरच्या रानात तेव्हा गीत हे गातील वारे

धूर्त साऱ्या माणसांची जाहली जेव्हा दुकाने
त्या क्षणी माझ्या घराची बंद होती सर्व दारे

पिंजऱ्याची चीड होती, पंख हे आयुष्य माझे
या नभाच्या आशयाला शब्द माझे लाख तारे

पावसाला हाक जेव्हा मोर हे घालीत आले
लाभले प्रीतीस माझ्या रंगवेडे हे पिसारे

वाहुनी नेतील लाटा मौन माझे गूढ रात्रीं
एकदा नसतील तेव्हा सागराला या किनारे

ग
झ
ल

०४

डोळ्यांवरून माझ्या उतरून रात्र गेली
वचने मला दिलेली विसरून रात्र गेली

डोळ्यांत जन्म सारा दाटून डोह झाला
अश्रूंत चंद्र माझ्या विखरून रात्र गेली

मी मानिले मनाशी माझेच सर्व तारे
स्वप्नात हाय माझ्या बहरून रात्र गेली

आश्वासने किती ती, पाऊस तो फुलांचा
काळोख फक्त हाती ठेवून रात्र गेली

०८

गाण्यात सर्व माझ्या माझे इमान आहे
ज्याचे खरे न गाणे तो बेइमान आहे

येता समोर दुःखे तो षड्ज झेलला मी
काट्यांवरी स्वरांची झुलती कमान आहे

झाडांत पावसाच्या बेहोष आरतीला
वाजे मृदंग तेथे माझाच प्राण आहे

कां वेदनेत होतो हा जन्म साधनेचा ?
रेषाच संचिताची ही बेगुमान आहे

आयुष्य पेटताना ओठांत सूर होता
हे सोसणे सुराला माझ्या प्रमाण आहे

०६ फुलांची पापणी ओली कुणासाठी कुणासाठी ?
पहाटे जाग ही आली कुणासाठी कुणासाठी ?

अशा या चांदण्या रात्रीं जुईच्या मांडवाखाली
उदासी दाटुनी आली कुणासाठी कुणासाठी ?

नदीकाठी कुणी नाही, भरे काळोख हा सारा
झुरे दूरातला तारा कुणासाठी कुणासाठी ?

सुखाची हाक येताना धुके दाटून कां येते ?
असे ओढून हे नेते कुणासाठी कुणासाठी ?

०७ काळीज हे जळाले तरिही पिऊन घेतो
हे एकलेपणाचे विष मी पिऊन घेतो

आत्मा विकून माझा केला कधी न सौदा
माझीच ही अहंता आता पिऊन घेतो

जमले थवे किड्यांचे, जाहीर नाश माझा
माझ्याच मृत्युची मी मस्ती पिऊन घेतो

हातात कापणाऱ्या पेल्यात रात्र झाली
काळोख सर्वव्यापी आता पिऊन घेतो

०८

सारे मला मिळाले काही न मागता
कळले अपार सारे काही न सांगता

आता पहाट झाली माझी ललाटरेषा
निःशब्द केशराची ही हाक रंगता

चंद्रासवे पहाटे भाषा बुडून गेली
पाणी अथांग झाले हे प्राण जागता

माझेच श्वास झाले आता नव्या दिशा या
ये मोगरा फुलोनी हा सूर लागता

०९ वाट होती आंधळी अन् भोवती अंधार होता
हात तू हाती दिला गऽ एक हा आधार होता

सोशिले तू सर्व काही वाट माझी चालताना
साहिले पायांत काटे हा तुझा शृंगार होता

वैर केले या जगाने, घाव सारे घेतले तू
पापण्यांनी झेलला गऽ तूच हा संसार होता

बोललो नाही तरीही जाणतो मी आत सारे
चांदणे झालीस, माझे दैव हे अंगार होता

गीत गाता अंतरीचे गीत मी गातो तुझे गऽ
तू दिलेल्या रागिणीला कोवळा गंधार होता

१० कुणी मज पाहिले नाही नजर चुकवून जाताना
कुणी मज ऐकिले नाही तुझे मी गीत गाताना

किती त्या चांदण्या रात्री, किती भेटी, उसासे ते
मलाही समजले नाही मला समजून घेताना

तुझ्या डोळ्यांत बघताना मला मी विसरुनी गेले
कुणी मज छेडिले नाही तशी बेहोष होताना

क्षणांची लाजऱ्या साऱ्या तुझ्यापाशी फुले झाली
कुणीही जाणिले नाही असे उमलून येताना

११

गीत हे गाशील तेव्हा मी जगी असणार नाही
प्रीत ही स्मरशील तेव्हा मी तुला दिसणार नाही

कोवळ्या किरणांत जेव्हा केस तू सोडून येशिल
लाडकें लाजून माझे फूल हे हसणार नाही

चांदणे बिलगेल अंगा कोवळे रेशीम होउन
त्या क्षणी पाऊल माझे हे पुन्हा फसणार नाही

कालचे ना आज पाणी, अर्थ हे उरणार नाहित
पाहुनी चंद्राकडे मी आसवे पुसणार नाही

१२

आलो इथे कशाला माझे मला कळेना
या बेगडी जगाशी हा सूरही जुळेना

नाकारिले फुलांचा बाजार मांडणे मी
म्हणुनीच संकटांची माध्यान्ह ही टळेना

झेलून घाव सारे केली अपार प्रीती
पण प्रीतिचा हिशोबी व्यवहार आकळेना

ही रक्त शोषणारी सिंहासने सभोती
सत्तेपुढे अशा या माझा दिवा जळेना

धनवंत पथ्थरांच्या दिसल्या अमाप राशी
दगडात देव कोठे शोधूनही मिळेना

मी हाक घातली अन् माझेच शब्द आले
माझ्या घरावरोनी काळोख हा ढळेना

मी आसवांत माझ्या ही रात्र चिंब केली
पण ध्यास लागलेला तो चंद्र आढळेना

१३ माझ्या सुरात माझा मी प्राण ओतला
हे गीत गात जा तू, शोधू नको मला

माझी इथेच गंगा, माझी इथेच काशी
गीतात याच माझ्या मज मोक्ष लाभला

काही कुठे दिसेना, काळोख दाटलेला
हे सूर शोधिताना मी सूर्य शोधिला

विश्वास जेथ होता तेथे विनम्र झालो
ताठ्यापुढे कुणाच्या ना शब्द वाकला

मृत्यूवरीहि माझ्या शिंपीन चांदणे मी
ठेवीन साक्ष तेव्हा रानातल्या फुला

१४ बुडणार चंद्र आता, हे संपतील तारे
या गलबतास माझ्या आता नवे किनारे

नाही कुणाचसाठी या थांबणार लाटा
अज्ञात प्राक्तनाचे दुर्दम्य हे इषारे

हा जन्म कां? कशाला? मृत्यू कुणास येतो?
माझ्या पराभवाची उघडी हजार दारे

प्रीती तुझी मिळाली हा योग संचिताचा
गाणे तुझे फुलांना हे सांगतील वारे

१५ अवकाश भारलेला, प्राणांत चांदणे
दोघें अथांग आता संपून बोलणे

स्वप्नातल्या जळीं या ही चंद्रकोर हाले
श्वासात श्वास आता गुंफून चालणे

पानांतुनी म्हणाले हलकेच फूल गाणे
नव्हतेच या क्षणाचे काहीच मागणे

कां पापण्यात आले दाटून सांग पाणी ?
कां हे असे सुखाचे भलतेच वागणे ?

१६

मी फुले ही वेचताना सांज झाली
दूर रानातून त्याची हाक आली

थांबली भांबावुनी ही सर्व झाडे
सावल्यांच्या भारलेल्या हालचाली

कापऱ्या तंद्रीत कोणी स्वप्नपक्षी
हालल्या भासापरी रानी मशाली

टाकुनी सारी फुले ही धावले मी
चांदण्याचा थेंब माझ्या एक गालीं

१७ बाजारच्या दिशेने ते सर्व धावले
मी एकटाच वेडा, हे पाय थांबले

माझी दिशा निराळी मी जाणिले उरी
पाठीवरील ओझे मी दूर फेकले

डोळे वटारुनी ते बोलाविती मला
त्या थोर शाहण्यांनी मज शाप घातले

कोलाहलात रत्ने ते मोजिती तिथे
मी सांगतो फुलांना हितगूज आतले

१८

घेउनी सर्वस्व माझे एकदा बहरून जाइन
चांदण्याची झुळुक होउन एकदा लहरून जाइन

कापऱ्या पाण्यात जेथे हालते फांदी फुलांची
स्वप्नवेडे भास माझे तेथ मी ठेवून जाइन

मी हळू माझ्या फुलाचे लाजरे झाकीन डोळे
श्वास माझे सोबतीला मी तुला देऊन जाइन

जे तुझ्यासाठीच आहे दाटले ओथंबुनी हे
गीत माझ्या अंतरीचे एकदा उधळून जाइन

१९ तिने बेचैन होताना कळ्यांनी श्वास टाकावे
तिने होकार देताना जिवाचे चांदणे व्हावे

किती मोजू तऱ्हा आता तिच्या त्या वार करण्याच्या
तिच्या हाती कट्यारीने सुखाचे खेळणे व्हावे

कधी ते डाव मांडावे, कधी हासून मोडावे
तिच्या रुसव्यात शब्दांचे दुहेरी बोलणे व्हावे

तिच्या डोळ्यांतले पक्षी फुलांचे सोबती होते
कितीदा रंग स्वप्नांचे निजेवर सांडणे व्हावे

२० गुलाबांची परी जेव्हा जरासे पाहुनी गेली
किती कांची घरे तेव्हा पुराने वाहुनी गेली

कितीदा चंद्र साक्षीला, तिने निःश्वास टाकावे
पुरे इतुकेच, स्वप्नी ती कुणाच्या राहुनी गेली

जराशी पापणी लवता कुणी स्वामी ढिले झाले
तिने अन् ओढिता छाटी जवानी वाहुनी गेली

कुणी जेव्हा धिटाईने पुढे झाले जरा थोडे
करीं काटे कितीकांच्या सुखाने लावुनी गेली

कुणाला दाद मागावी ? कुणा फिर्याद सांगावी ?
इथे सारेच आरोपी, विजेने दाहुनी गेली

२१ पाऊस कोसळे हा, अंधारले दिसे
डोळे भरून आले माझे असे कसे ?

गेल्या बुडून वाटा, गेली बुडून राने
झाले उदास गाणे माझे असे कसे ?

या पावलांस लाटा ओढून खोल नेती
हे प्राण ओढ घेती माझे असे कसे ?

कां सांग याद येते ? एकान्त हा सभोती
हे सूर डोह होती माझे असे कसे ?

२२ नसांतुन चंद्रज्योतींनी जळत झडणार आहे मी
पुन्हा येशील तू तेव्हा पुन्हा बुडणार आहे मी

कट्यारी वेदनांच्या त्या उरी झेलून घेइन मी
पुन्हा डोहात त्या वेड्या तशी पडणार आहे मी

कशासाठी अशी चाले जिवाची क्रूर तगमग ही?
पुन्हा या प्रश्नचिन्हाशी खुळी अडणार आहे मी

असू दे शूल मरणाचा, असू दे घोट जहराचा
तरी जळत्या सुखाला त्या अशी भिडणार आहे मी

२३

उधळून रंग सारे पूजेस लागली
बाकी नका विचारू मोजून मागली

घोटाळती कुणी हे दारी अजूनही
बाजेवरी कुणी अन् तल्वार टांगली

हे सोंग की खरे हे सांगेल का कुणी ?
ही सर्व प्रश्नचिन्हे हैराण पांगली

होती तशीच आहे अजुनी मिजास ती
वाटे सकाळ होता ती रात्र जागली

ती रंग चोरणारी कां अंग चोरिते ?
पायात वाकडी कां ही वाट वागली ?

माझा हिशोब नाही केला तिने पुरा
माझी तहान आता व्याजात भागली

२४

बागेत अक्षरांच्या जन्मास फूल आले
अपुल्याच अंतरीच्या रंगात फूल न्हाले

वळणावरी दिठीच्या एकान्त खिन्न काळा
हे कोवळ्या उषेचे त्याला न फूल भ्याले

रंगीत पाखरांचा बाजार पिंजऱ्यांचा
पाहून फूल माझे दुःखी उदास झाले

ती सांज धुंद ओली, त्या चिंब आणभाका
मातीत गंधगाथा वाचीत हे निघाले

सुकले तरीहि आहे पत्रात हे तुझ्या त्या
त्या मूक पाकळ्यांचे गाणे मला मिळाले

गाण्यात फूल आहे, आहे फुलात गाणे
स्वप्नात सोनवर्खी चंद्रापरी बुडाले

२८ डोळ्यांत सांजवेळी आणू नकोस पाणी
त्या दूरच्या दिव्यांना सांगू नको कहाणी

कामात गुंतलेले असतील हात दोन्ही
तेव्हा नको म्हणू तू माझी उदास गाणी

वाटेवरी खुणेच्या शोधू नको फुले ती
ना ठेविते फुलांची माती इथे निशाणी

सौदा इथे सुखाचा पटवून चोख घ्यावा
व्यवहार सांगती हा ही माणसे शहाणी

कळणार हाय नाही दुनिया तुला-मला ही
मी पापण्यांत माझ्या ही झाकिली विराणी

२६

बुल्बुल् मला म्हणाला : आयुष्य हे दिवाणे
काटा उरात आहे, ओठांत धुंद गाणे

भीती उभी सभोती, हाकेवरी पहारे
डोळ्यांत क्रूर हिंसा, टपले इथे ससाणे

हृदयात खोल झाल्या जखमेत सूर आहे
तो सत्य एक, बाकी सारेच हे बहाणे

तो कोसळून पडला फांदीवरून खाली
निष्प्राण हो स्वरांचे ते फूल दीनवाणे

२७ माझ्या घरात भिक्षा मी मागणार नाही
समजून घे तुझे तू, मी सांगणार नाही

प्राणांतल्या विजांना शब्दांत झेलले मी
मोजीत काजव्यांना मी जागणार नाही

भरुनी अथांग झाल्या माझ्याच भावना या
आता इथे करंटा मी वागणार नाही

हलले पराग सारे या चांदण्यात माझे
शून्यास या सुखाने मी भागणार नाही

२८ भीती धरू कशाला जर जायचेच आहे
या मातिच्या घरांना विसरायचेच आहे

काळोख पाहताना हलली न पापणी ही
हे गीत एकट्याने मज गायचेच आहे

मृत्यूसमोर माझ्या मी वेचिली फुले ही
घेऊन माळ माझी मज यायचेच आहे

हे माग पावलांचे पुसतील पार लाटा
तेव्हा विनाकिनारा मज व्हायचेच आहे

२९ कटाक्षांची तिची दुनिया, तिचे ते श्वास मायावी
विषाची कां कळेना त्या जिवाला प्यास लागावी ?

तिच्या ओठांतली जादू : स्मिताचे चांदणे ओले
तिच्या गाण्यावरी कां ही जिण्याची तार वाजावी ?

फुलांचा मंत्र घालुन ती करी बंदी भुलाव्याने
तरी त्या इंद्रजालाची पुन्हा कां ओढ वाटावी ?

कधी ती बोलली होती, असेलहि भास तो झाला
पहाटेला तरी स्वप्नी तिची चाहूल कां यावी ?

३० गात होतो जिंदगीभर मी तुझी गाणी
ना कधी आले परी डोळां तुझ्या पाणी

दाद लाभे या जगाची भोवताली सारखी
साद ना देई परी स्वप्नातली राणी

भाग्य माझे केवढे हे, केवढे भांडार हे
हाय पण ठरलीच अंती व्यर्थ ही वाणी

गौरवाचे हार आता शोभती माझ्या गळां
आतली माझी व्यथा ही ना कुणी जाणी

३१

यशाला घालिती माला, यशाचे सर्व देव्हारे
यशाची लागता किल्ली खुली होतात ही दारे

यशाच्या जाहिरातीला दलालांच्या खुल्या पेठा
नटीचे लाडके कुत्रे बने संताहुनी प्यारे

यशाचे सर्व हे हुजरे, यशाला सर्व हे मुजरे
यशाच्या दैवतावरती स्तुतीचे सर्व भंडारे

यशाचा खोकलासुद्धा विके गाण्यापरी येथे
यशाला हे गुणीसुद्धा असे लाचार सामोरे

यशाच्या आसनावरती जरासे बूड टेकावे
किती गर्दी, किती टाळ्या, किती हे स्तोत्र गाणारे !

नको सौधाकडे पाहू तुझा तू चालता रस्ता
तुला ठाऊक आहे ना, यशस्वी थुंकती सारे ?

३२

माझ्याच भावनांना मज जाळता न येते
माझ्याच वेदनांना मज टाळता न येते

असुनी अभाव सारा हे स्वप्न पाहतो मी
तुडवीत या फुलांना मज चालता न येते

संपेल मार्ग तेथे काळोख किर्र आहे
तरिही मलाच बेडी मज घालता न येते

बहिरे उभे सभोती हे वाजवीत टाळ्या
माझ्या उरात गाणे मज कोंडता न येते

ही रीत या जगाची अन् वेगळीच भाषा
समजूत आसवांची मज काढता न येते

ही सांज काजळे अन् बुडती तमात झाडे
प्राणातली उदासी मज टाकता न येते

३३ क्षितिज हे वेड्या फुलांनी सांजवेळी पेटलेले
आज हे माझ्या जिवा कोणी जिवाचे भेटलेले

कापऱ्या पाण्यात होडी सावळ्या तंद्रीत आहे
हात माझे लाजुनी हातांत कोणी घेतलेले

कुंतलीं गजरा सुखाचा आज आहे माळलेला
रात्र ही नाही तरी कां चांदणे हे दाटलेले ?

आज ओठीं संचिताच्या मीच आहे एक गाणे
या तुझ्या श्वासांत आता सूर सारे साठलेले

३४ कोठून हाक येते, कोठून हे इषारे ?
कोमेजती कशाने हे शुभ्र शुभ्र तारे ?

काळोख हात ठेवी खांद्यावरी भयाचे
वारा नसून कैसी ही कापतात दारे ?

पायातळीं फुलांची ही रास सांडलेली
प्राणांस झोंबती कां हे पेटले निखारे ?

सर्वस्व ओतुनी मी हा जीव लाविलेला
कां काजळून गेले हे भोवताल सारे ?

३५ थंड जरि बाहेर, आतुन पेटलो इतुके पुरे
बोललो नाही तरीही भेटलो इतुके पुरे

सर्कशीचे खेळ सारे, फक्त तंबू वेगळे
माणसे होऊन येथे भेटलो इतुके पुरे

बोललो असतो तरीही शब्द हे अंधारते
तेवत्या डोळ्यांत आपण भेटलो इतुके पुरे

सर्व ही हातीं सुखाच्या नाचणारी बाहुली
दुःख आतुन जाणताना भेटलो इतुके पुरे

३६ एकान्त एक साथी घेऊन चाललो
काळोख खिन्न हाती घेऊन चाललो

माझ्याच पावलांचा आवाज ये मला
ही शून्यता सभोती घेऊन चाललो

आश्वासने दिव्यांची गेली विझून ती
थिजल्या उदास वाती घेऊन चाललो

ओतून मद्यपात्रे नच दाह थांबला
मी आग ही प्रमाथी घेऊन चाललो

माझ्याच प्राक्तनाशी दावा असा उभा
हा भार सर्व माथी घेऊन चाललो

३७ होय तू म्हटलेच नाही जाणतो मी
व्यर्थ कां आशा सुखाची ताणतो मी ?

पाहसी ना पाहसी तोऱ्यात जासी
वेचुनी तारे तरी कां आणतो मी ?

वेलशी स्वप्नात तू येशी फुलोनी
त्या फुलांनी जाग ही कां न्हाणतो मी ?

भेटसी रस्त्यात जेव्हा तू दुपारी
या उन्हाळा चांदणे कां मानतो मी ?

३८ दाटुनी येता उदासी कां तुझी मज याद येते ?
मी मला चुकवू पहातो आतुनी पण साद येते

टाळिले आयुष्य सारे मी तरी जगतोच आहे
एकदा चुकुनी समेला ही अशी पण दाद येते

खोल होती सावल्या या आणि वारा सैर होतो
कां स्मृती उजळून आता ते जुने संवाद येते ?

आंधळ्याच्या प्राक्तनाला कोठुनी डोळे असावे !
रात्र वेड्या पावलांचे घेउनी पडसाद येते

३९ फसात कोरलेल्या शहरात हिंडलो मी
रंगीत बाहुल्यांच्या बहरात हिंडलो मी

प्रत्येक पावलाशी बाजार पेरलेला
बेहोष विक्रयाच्या कहरात हिंडलो मी

आत्म्यास सक्त होता मज्जाव कायद्याचा
या रोख वायद्याच्या प्रहरात हिंडलो मी

प्राशून ही कुबेरी प्रासाद झिंगलेले
या आत्मवंचनेच्या कुहरात हिंडलो मी

चुकवी स्वतःस जो तो खेळात या सुखाच्या
काळीज जाळणाऱ्या जहरात हिंडलो मी

संपवोनी बाल्य माझे दुःख झाले जाणते
भेटते आता सुखाला, हास्य ओठीं आणते

नाटकांचे खेळ माझ्या भोवताली पाहुनी
भाबडा श्रोता बनोनी सत्य सारे मानते

भोवतीचे स्वार्थ सारे, द्वेष सारा सोसुनी
रंगवोनी चेहरा हे प्रेम ते वाखाणते

कौतुकाच्या झेलते टाळ्या कधी गर्दीमधे
आतला काळोख तेव्हा पापण्यांनी झाकते

बंद जेव्हा सर्व दारे एकटे बाहेर हे
स्पर्शुनी माझ्या जिवाला गोष्ट आतिल सांगते

४१ केला तुरुंग यांनी माझ्या पराक्रमाचा
केला सुरुंग यांनी माझ्याच या यशाचा

जावे कुठे न जावे, प्यावे कुठे न प्यावे
आहे तयार येथे सारा हिशोब याचा

मी बाहुलेच झालो बाजारभाव ज्याला
खोटाच रंग आता हो सोबती सुखाचा

माझीच ही प्रतिष्ठा करिते गुलाम माझा
सन्मान हाय माझा हो फास या गळ्याचा

गर्दीत भोवतीच्या कां एकटा असा मी ?
कोणा नकोच होता हा पीळ आतड्याचा

दाबून हुंदका मी वस्तीत येथ उंची
हा खेळ थोर होता आतून फाटण्याचा

दाणे मला सुखाचे हे घातलेत यांनी
मी पंखशून्य स्वामी माझ्याच पिंजऱ्याचा

४२ या कागदी फुलांच्या पड्यावरील बागा
या मैफिलीत माझी नाही कुठेच जागा

मी सूर शोधितो तो येथे न सापडेल
अश्रू म्हणून काचा विकण्यास येथ रांगा

मी झोकिलेत प्याले, बेहोष पार झालो
यांनी पिटून छाती केला सवंग त्रागा

जल्लोष हा न माझा, माझी न रोषणाई
हे प्राण जोडणारा तो वेगळाच धागा

माझे न नाव येथे, माझे न गाव येथे
माझ्या खुणा विचारा कुसुमातल्या परागा

४३ एकदा येईन सजणा, परत मग जाणार नाही
मैफिलीतुन या जगाच्या मी पुन्हा गाणार नाही

श्वास माझे कोंडुनी मी खेळणी केली जमा ही
उधळुनी येईन सारी, वळुन मी बघणार नाही

गाव हे राहील मागे, ही घरे विरतील सारी
संपला तो जन्म आता, आज मी रडणार नाही

पूरही येवोत आता, कोसळो पाणी कितीही
टाकिले पाऊल, मागे हे अता फिरणार नाही

४४ रात्र आहे वादळी, वारा पिसा सैराट आहे
रोशनीच्या दुश्मनांनी रोखिलेली वाट आहे

कोसळाया आज आली आसऱ्याची सर्व झाडे
दोस्त हो, जागे रहा, ही वैरियांची रात आहे

स्पर्श हे करितील त्याची कोंडणारी भिंत होते
कोळसे होती मनाचे ही इथे वहिवाट आहे

कोवळ्या माना फुलांच्या मोडणारे हात येथे
पाय टाका रोवुनी, काळोख आता दाट आहे

ही इमानाची दलाली, हे यशाचे कोंडवाडे
पापणी जागी असू द्या, हा यमाचा घाट आहे

४८ सावल्यांचा काफिला हा चालला आहे कुठे ?
जीवनाचा हा बहाणा चालला आहे कुठे ?

चेहरे ओसाड यांचे टांगले खांद्यांवरी
आंधळा काळोख सारा चालला आहे कुठे ?

लोटिती हे एकमेका, कोडगी यांची नशा
झिंगला बाजार यांचा चालला आहे कुठे ?

घोषणांनी व्यापिती हे अंतरीची रिक्तता
आत्महत्यांचा जथा हा चालला आहे कुठे ?

थुंकती सूर्यावरी हे, शौर्य यांचे केवढे !
बुड्‌बुड्यांचा हा तमाशा चालला आहे कुठे ?

पावतो ना देव यांचा एकही लाचेविना
भेकडांचा धर्ममेळा चालला आहे कुठे ?

४६ जमलेत सर्व सोदे सौदा इथे कराया
विकतील बापआई हे तुंबडी भराया

कधि झाडतील लाथा, पडतीलही गळ्यात
बघती गळ्यावरी हे संधी सुरी धराया

जाऊन मंदिरी हे करिती दुकान त्याचे
बडवेगिरीस यांच्या नाही दया न माया

सत्ता मिळेल तेथे हे लाळ घोटतील
हे झेलतील थुंकी खुर्चीमधे शिराया

खातील त्या घराचे हे मोजतील वासे
जळवाच सज्ज साऱ्या शोषून रक्त घ्याया

माधुर्य पेरिती हे सम्राट साखरेचे
फिरवून रोज टोपी हे लागले फिराया

टोळ्या करून चरती हे हावरे लुटारू
अन् सर्व देश यांनी हा घातला मराया

४७ निरोप घेताना डोळ्यांत आसवे आणणार नाही
जिवाच्या पाखरा पिंजऱ्यात तुला कोंडणार नाही

कोसळली सर अंगावर माझ्या माझ्याचसाठी
पुन्हा वृष्टीसाठी लाचार मागणे मागणार नाही

पक्षी अचानक सांगत गूज झाडावर आला
उडून जाताना फांदीवर आशा टांगणार नाही

हळू बिलगले पाण्याला चांदणे उत्तररात्री
चंद्र बुडताना खोटे गहिवर काढणार नाही

कोवळ्या क्षणांची फूलपाखरे तुझ्यामुळे झाली
हावऱ्या हातांनी पंख तयांचे खुडणार नाही

प्रत्येक फुलाच्या धुंद कहाणीला शेवट असतो
पुस्तकातल्या सुकल्या फुलांना शापणार नाही

४८ ते दान त्या क्षणाचे घेता मला न आले
उधळून प्राण माझे देता मला न आले

होते गळ्यात गाणे पण श्वास कोंडलेला
माझेच सूर तेव्हा गाता मला न आले

डोळ्यांत पाहिले मी आभाळ भारलेले
हे पंख कापलेले : उडता मला न आले

झोकून देत सारे आल्या उधाणलाटा
मी कोरडा किनारा, भिजता मला न आले

हे रान मोर झाले बेहोष नाचणारा
आषाढ झेलुनी तो फुलता मला न आले

जे मोजता न येते केला हिशोब त्याचा
होतो जिवंत तरिही जगता मला न आले

४९ गाणी तुझी ओठांतली आता विराया लागली
स्वप्ने तुझ्यास्तव पाहिली मागे फिराया लागली

गावात जेव्हा पोचलो काळोख होता दाटला
माझ्या दिव्यावर काजळी कां ही धराया लागली ?

झाडांत वारा थांबला की हुंदका दबला जसा
प्राणात माझ्या कां अशी भीती भराया लागली ?

आहे जिवंत खरेच मी की भास हा होतो मला ?
काळ्या भ्रमाची ही सुरी छाती चिराया लागली

निर्जीव काचेसारखे आभाळ हे माथ्यावरी
शून्यात माझी पावले आता शिराया लागली

८० मी निघालो, दार तूही लाव आता
सोबतीला फक्त उरले घाव आता

चेहरे साऱ्या घरांनी झाकलेले
जाहले परके मला हे गाव आता

ओळखीची वाटही दूरस्थ झाली
मी न उच्चारीन माझे नाव आता

मी निघालो घेउनी पेला रिकामा
सांग मी घेऊ कशाचा ठाव आता ?

चाललो चोरापरी हा एकटा मी
जिंकले ते सर्व ठरले साव आता

पान गाण्याचे असे हे फाटलेले
अक्षरांना भार झाले भाव आता

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. 23324
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

८१ चिडत कां नाहीत इथली माणसे ?
कढत कां नाहीत इथली माणसे ?

थंड प्रेतासारखी वस्ती दिसे
उठत कां नाहीत इथली माणसे ?

कोंडलेला धूर ना बाहेर ये
जळत कां नाहीत इथली माणसे ?

मध्यरात्री क्षीण किंकाळी फुटे
रडत कां नाहीत इथली माणसे ?

दांडग्यांची थाप ये दारावरी
धजत कां नाहीत इथली माणसे ?

लागलेले फास हे यांच्या गळां
पडत कां नाहीत इथली माणसे ?

कोंबले तोंडांत बोळे गच्च हे
मरत कां नाहीत इथली माणसे ?

दहशतीच्या सर्व या येथे खुणा
भिडत कां नाहीत इथली माणसे ?

इथे तरंगत ही फूलपाखरे फिरती
तिथे तळ्यात निळ्या शुभ्र पंख थर्थरती

कुठे सुरावटशी लाल पालवी फुटते
कुठे उन्हात झरे सैल सैल पाझरती

हरेक झाड इथे घेउनी निमंत्रण ये
फुले सुवास असा गर्द गर्द अंथरती

कळे न साद कुणी घातली कुठून अशी
मनात सूर असा फेर कोवळा धरती

मुळी न मेघ कुठे एकही नभात दिसे
परी सरी कुठुनी आत आत या झरती ?

मला न अर्थ कळे : ही लिपी अगम्य अशी
तरीहि शब्द उरी कां अबोध झंकरती ?

८३ जमाखर्च स्वातंत्र्याचा मांडणार केव्हा ?
जाब उंच प्रासादांचा मागणार केव्हा ?

धूर्त शोषकांच्या ओठीं घोष संस्कृतीचा
चूड इथे या ढोंगाला लागणार केव्हा ?

जाहिरात आई ज्यांची, जाहिरात बाप
आत्मविक्रयाचे झेंडे फाडणार केव्हा ?

विलायती वेषामधली भुंकतात कुत्री
माणसास माणुस येथे मानणार केव्हा ?

घाम ओतुनी जो पिकवी मळे अमृताचे
दिवा झोपडीतुन त्याच्या लागणार केव्हा ?

प्राक्तनात अस्पृश्यांच्या छळाचीच गाथा
आग आंधळ्या धर्माला लावणार केव्हा ?

इथे पडे सत्तेभवती कडे भ्रष्टतेचे
काजळी दिव्याभवतीची झाडणार केव्हा ?

किती काळ बघत बसावे फुगे घोषणांचे ?
भास हे भ्रमाचे सारे फोडणार केव्हा ?

८४ कोण मी यांचा अखेरी आणि माझे काय नाते?
मी कशाचा येथ साक्षी? मी म्हणू माझा कुणाते?

जात अन् उपजात यांची, धर्म यांचे, द्वेष यांचे
घोषणा घोषीत उंची लांडग्यांची फौज जाते

यावयाला झिंग यांना लागते अध्यात्मगोळी
माजले स्वामी, बुवा, आचार्य यांचे मोक्षदाते

सोसवेना एकही यांना विरोधी शब्द साधा
आतुनी मारेकरी हे संस्कृतीचे थोर त्राते

झेलिती थुंकी खळांची, लाथ यांची सज्जनांना
भ्रष्टतेचे अश्व यांच्या ओढिती सत्तारथाते

झुंडशाहीच्या नखांची दाविती सत्यास भीती
शापिती हे आरशांना पाहुनी अपुल्या मुखाते

मेंढरांचे काळ हे, सेनापती हे भेकडांचे
सोसताना सत्य यांच्या मनूगटांचे शेण होते

दहशतीचे बूट जेव्हा वाजती रस्त्यातुनी या
षंढ या साऱ्या घरांच्या धाप लागे काळजाते

५८ उन्मत्त श्वापदांची आली वरात आली
जिंकून राजरस्ते घुसुनी घरात आली

एकाहि सज्जनाचे घर सोडिले न यांनी
प्रत्येक सात्विकाच्या बेडी करात आली

जमले थव्याथव्यांनी तांडे समर्थकांचे
लाचार गांडुळांची भक्ती भरात आली

जे माननीय होते लाचार तेहि झाले
अब्रू पितामहांची सस्त्या दरात आली

गणवेष घातलेले मारेकरी सभोती
देण्यास लाच टोळी ही मंदिरात आली

मुर्दाड नागड्यांचा हा चालला तमाशा
ज्योती खुडून साऱ्या ही काळरात आली

विकिले न हात ज्यांनी झेलावयास थुंकी
कळ एक जीवघेणी त्यांच्या उरात आली

८६ मी दिला आवाज येथे लाभली पण साथ नाही
हात हा केला पुढे मी लाभला पण हात नाही

थांबलो रस्त्यात जेव्हा दाटली गर्दी सभोती
पाहिले साऱ्या जणांनी पाहिले पण आत नाही

सभ्य शिष्टाचार यांनी मांडिले खुर्च्यांप्रमाणे
ओतिली पात्रांत पेये, ओल पण हृदयात नाही

देवळाला भाव आला, दर्शनाला लांब रांगा
सत्य दाहक पाहण्याचे त्राण पण यांच्यात नाही

भोवती वाचाळ सारे जाहिराती ओकणारे
साचला सर्वत्र चोथा प्राण पण शब्दात नाही

कागदांच्या या ढगांनी व्यापिले आकाश सारे
घोषणा झाल्या हजारो एक पण बरसात नाही

मोडिती डोळे स्वरांच्या सर्व या बाजारपेठा
आतले गाणे खरे कोणी कसे पण गात नाही !

८७ थोर आपण मानिली ही भ्रष्ट सारी माकडे
अन् दिले हातांत त्यांच्या पेटलेले काकडे

कां अता छाती पिटावी लागता आगी घरां ?
देव येइल कोणता हे निस्तराया साकडे ?

धर्म यांचा मारणे सोयीप्रमाणे या उड्या
याचसाठी लाभलेले पाय यांना फाकडे

काल ज्या झाडांवरी ही आश्रयाला थांबली
आज ही शत्रूप्रमाणे पाहती त्यांच्याकडे

जा कुठेही हीच तेथे चेहरे फेंदारुनी
पाय जेथे टाकिती ते सर्व रस्ते वाकडे

पक्ष यांचा कोठला, टोळी तयांची कोठली ?
जात यांची एक अंती, प्रश्न सारे तोकडे

हालवोनी शेपट्यांना घोषणा यांनी दिल्या
आणिली तुमच्या चितेस्तव शोधुनी ही लाकडे

५८

ते म्हणाले चेहरे चुकवीत होतो
मी खरे तर आसवे लपवीत होतो

हासले ते पाहुनी मी वाकलेला
मुखवटे त्यांचेच मी जमवीत होतो

भासल्या या भ्याड त्यांना हालचाली
मी कळ्या कोमेजल्या फुलवीत होतो

बोलले ते भाकतो करुणा नभाची
पाखरे मी भाबडी उडवीत होतो

सांगती ते वागणे आले गळ्याशी
मी गळ्यातुन सूर हे रुजवीत होतो

८९ कोठून पूर येतो, कोठे वहात जातो ?
बघण्या उजाड वस्ती मागे कुणी रहातो

चोचीत चोच होती, होता गळा गळ्यात
चीत्कार फाटलेला वाऱ्यावरी वहातो

पारावरी सुन्या या रडते विषण्ण कुत्रे
वेडा बसून तेथे भेसूर गीत गातो

देऊळ येथ होते चिखलात ते बुडाले
लावून शून्य दृष्टी गगनी कुणी पहातो

ही बाग लाविलेली सारी जळून गेली
राखेत या फुलांच्या वारा इथे नहातो

साऱ्याच या दिव्यांच्या गेल्या विझून वाती
बेशुद्ध या घरांचा काळोख घास घेतो

कळले इथून गेला कोणी विचित्र प्राणी
जो आपुल्या पिलांना लागून भूक खातो

कोंडिले सारे उमाळे हे असे अधरांत मी
घेतले आयुष्य सारे चूकसे पदरात मी

ते म्हणाले दुःख त्यांचे जन्मले माझ्यामुळे
राहिलो निःशब्द तेव्हा एकटा तिमिरात मी

कोण येतो कोण जातो हे नसे हातातले
मी कधी बाहेर होतो आणि केव्हा आत मी

राहिले होते उभे जे माझिया खांद्यांवरी
त्राण त्या पायांत येता सोशिले आघात मी

जो फुलांना वाढवी कोणी न पाही त्याकडे
माणसे जे मारिती त्यांचीच होते बातमी

जे हवे ते घेउनी विसरून जाती पाखरे
ही उदासी भोगतो म्हणुनीच या बहरात मी

लूट ते घेऊन आले ओतिली माझ्यापुढे
फाटक्या माझ्या वहाणा, मूर्ख या शहरात मी

तू नको देऊ फुले ही, हात माझे कापती
वाढता काळोख आहे अन् उभा दारात मी

६१ हा आरसा असा मी कोठून आणला ?
माझाच चेहरा कां वेडावतो मला ?

झिंगून मी यशाने बेहोष चाललो
मी चाललो कुठे हा पण प्रश्न राहिला

जाळ्यापरी इथे मी हे शब्द फेकिले
हातात शून्य येते हा अर्थ लाभला

मी प्रेम व्यक्त केले आवाज भारुनी
हे सर्व झूट : आत्मा माझाच बोलला

मी लाख या दिव्यांची आरास मांडिली
कां काळजात माझ्या काळोख दाटला ?

माझ्या जितेपणाचा केला पुकार मी
कळले मलाच माझा आवाज कापला

हातात शस्त्र माझ्या, मी युद्ध जिंकलो
माझ्या उरात कां हा आक्रोश चालला ?

कैसे विरूप होते प्रत्येक रूप हे ?
कां नागडा जरी मी पोषाख घातला ?

६२ शपथ माझ्या जिवाची, शपथ साऱ्या जिण्याची
मुखवटे फेकिले मी, वेळ झाली पिण्याची

धुंडिले सर्व रस्ते, हरवुनी पार गेलो
ही घडी मात्र माझी, मी मला भेटण्याची

काल काळोख होता, फास होता गळ्याला
आज आभाळ आहे बाग ही चांदण्याची

शब्द सारे शिताफी झाकण्या सत्य येथे
भेट माझी तुझी ही आतले बोलण्याची

भोवताली घरांनी बंद केलीत दारे
आज नाहीच घाई पिंजरे टाळण्याची

आज तूही खरी अन् आज आहे खरा मी
रंग प्राणांत ओले, रात्र ही झिंगण्याची

सर्व त्यांच्या तिजोऱ्या ठार झाल्या यशाने
आस माझ्या स्वरांना चंद्र हा झेलण्याची

६३

अपयशाचा हा हिशोब समोर आहे
मी कुठे म्हटले तुला मी थोर आहे ?

उंच हे प्रासाद, सत्ता, सर्व त्यांचे
जा कुठेही, आज त्यांचा जोर आहे

शोधिले आयुष्यभर मी शब्द केवळ
शेवटी माझ्या गळ्याला दोर आहे

काय कवितांनी कुणाची भूक भागे ?
ते म्हणाले मी जिवाला घोर आहे

केवढी जत्रा तयांची, लख्ख शोभा
हरवलेला पोरका मी पोर आहे

या जगी काही मला विकता न आले
मी उपाशी नाचणारा मोर आहे

हार माझी आणि हा काळोख माझा
ज्यात चंद्राची इमानी कोर आहे

६४ अजुनी फुले फुलतात ना ?
हे रंगही खुलतात ना ?

धुमसून कां जळतात हे ?
अजुनी मने जुळतात ना ?

फांदीवरी हिरवे चुडे
फुलपाखरे झुलतात ना ?

उडुनी नभी पक्षी पुन्हा
घरट्याकडे वळतात ना ?

कमळे तळयात निळया निळया
वाऱ्यावरी कलतात ना ?

लहरी फुलांची वाट ही
डोळे इथे भुलतात ना ?

पडते घरावर चांदणे
किरणे जळी हलतात ना ?

अजुनी मनातिल स्पंदने
माझी तुला कळतात ना ?

६८ हे खरे की खूप माझे हाल झाले
ना कधी गाणे परी बेताल झाले

हे खरे की हा खिसा होता रिकामा
हृदय हे नाही परी कंगाल झाले

हे खरे की शब्द हे दुबळेच होते
फाटणाऱ्या माणसाला ढाल झाले

हे खरे की बोलणे हे क्षीण होते
पण शिवीहुन एकदा इरसाल झाले

हे खरे की कापले अस्तित्व सारे
पण अभाग्याला उबेची शाल झाले

रंगांस या स्वरांनी मी गुणत राहिलो
गाणे कळ्याफुलांचे गुणगुणत राहिलो

चोरून घेतलेली पहिलीच भेट ती
मी मुग्ध काकणांनी किणकिणत राहिलो

झंकार पालवीचा फांदीतुनी फुटे
मी तार त्या स्वरांनी झिणझिणत राहिलो

लडिवाळ वाहताना खडकांतुनी झरे
मी छंद भारलेला रुणझुणत राहिलो

ध्यानस्थ मध्यरात्री निःशब्द शांतता
मी आतल्या दिव्याने मिणमिणत राहिलो

झाली पहाट जेव्हा ही शुभ्र प्रार्थना
हे सूक्त पाखरांचे मी म्हणत राहिलो

हे वेगळेच रस्ते, ही वेगळीच नाती
शहरात माणसांना ही माणसेच खाती

इथल्या इमारतींना आकाश ठेंगणे हे
सर्वत्र तक्षकांच्या या माजल्या जमाती

रस्त्यावरी उपाशी हे मूल माणसाचे
घाईत माणसे ही बघती, निघून जाती

येथील भक्षकांना गणवेष रक्षकांचे
अन् बेरके लुटारू नेतेपणात न्हाती

मांडून सापळे ही टपुनी उभी दुकाने
टाळूवरील लोणी यांच्या सदैव हाती

पिकवी कुणी न काही, विकतात मात्र सारे
वाहून भार यांचा शरमून जाय माती

गर्दीत राहुनीही परकेपणा न संपे
येथे मुकेच सारे बहिऱ्यांसमोर गाती

६८

गवतात झाकलेली विजनातली समाधी
नाहीच नाव काही उरली न खूण साधी

पडकी विहीर गेली बाजूस ही बुजून
वस्ती इथे असावी वर्षे अनेक आधी

होता गृहस्थ कोणी, अज्ञात वा महात्मा ?
किंवा कुणी विरागी ज्याला न पाश बांधी ?

बसुनी अनेक पक्षी येथे शिटून गेले
बाहेरच्या जगाची ही एवढी उपाधी

वारा भुताप्रमाणे बरळून जाय रात्री
काळोख ठार काळा होतो असह्य व्याधी

आली चुकून रस्ता ही पायवाट येथे
तीही इथून जाण्या बिचकून वाट शोधी

६९ तूच हातांनी तुझ्या हे बंद केले दार
शापुनी साऱ्या दिव्यांना ओढिला अंधार

घेतले तू बांधुनी डोळे खुषीने हे
झेलिती आता गटारे श्रावणाची धार

देवळांचा चालला तेजीत हा धंदा
ईश्वराला राहिला नाही कुठे आधार

घेतली सारी घरे आता दुकानांनी
या इथे अन् त्या तिथे हा नागडा बाजार

आज भाषा फक्त येथे थंड भिंतींची
नासल्या या भावना अन् नासला शेजार

ते यशस्वी धावती जे घेउनी झोळ्या
राहिले जे ताठ त्यांचा फाटला संसार

सांगती इतिहास खोटा हे कळे आता
मोडक्या म्यानात आहे गंजली तल्वार

आंधळे तांडे निघाले हे गुलामांचे
आंधळे सरकार यांचे आंधळा दर्बार

७० जडशील अशी रात्र, पडे मूर्च्छित वारा
चाहूल कुणाचीहि असो, जाग असू दे

सर्वत्र उभे रान इथे हे चकव्यांचे
पाऊल कुणाचेहि असो, माग असू दे

अन्याय उगारून उभा सर्पफणा ही
डोळ्यात कुणाच्याहि असो, राग असू दे

ग्लानीच तसे दाट धुके, थंड उदासी
प्राणात कुणाच्याहि असो, आग असू दे

वाऱ्यावरती राख उडे, धूर विखारी
स्वप्नात कुणाच्याहि असो, बाग असू दे

७१ बिंब सूर्याचे ठगांनी झाकले येथे
देवळांचे कळससुद्धा वाकले येथे

नेसणे गुंडाळिली डोईस थोरांनी
नागव्यांचे राज्य आता ठाकले येथे

द्रौपदी दुःशासनाला घालिते डोळा
नाव कृष्णाचे तिनेही टाकले येथे

जागजागी दहशतींचे ठाम हे अड्डे
राजरस्तेही ठगांनी रोखले येथे

सिंह हे लाचार अन् आयाळ झडलेले
पिंजऱ्यामधल्या सुखाने माखले येथे

दुर्जनांची फौज ही एकत्र झालेली
वंश साऱ्या सज्जनांचे फाकले येथे

जिंकिली ही झुंड सारी या लुटारूंनी
हात ख्रिस्ताचे खिळ्यांनी ठोकले येथे

७२ जाणिले आधीच होते जीव जडताना
श्वास हा ढळलाच नाही नाव बुडताना

शोधिले नाही कधी अस्वस्थ नजरेने
हात का दिसतात कोणा देठ खुडताना ?

झेलले सारे इषारे मी वसंताचे
स्तब्ध होतो आणि पाने सर्व झडताना

हात घरट्याने किती उंचावले तरिही
पाखरू नसते कुणाचे दूर उडताना

दैव होते व्याध हे ठाऊक का नव्हते ?
शांत होतो काळजाला बाण भिडताना

मी कधी नाकारिले नव्हते तुटायाचे
पाहिले का सांग कोणी फूल रडताना ?

गझल

७३ ते हासतात तेव्हा रडतों असा कशाला ?
त्यांचा वसंत, तेव्हा झडतों असा कशाला ?

होऊन आंधळे ते स्पर्धेत धावताना
मी मात्र उंबऱ्याशी अडतो असा कशाला ?

खोटेच रंग सारे, खोटीच रोषणाई
काळोख सोसुनी मी कढतो असा कशाला ?

गर्दी पिऊन जेव्हा ते झिंगतात सारे
मी एकटेपणाला भिडतो असा कशाला ?

फसवी उभी निशाणे सर्वत्र संस्कृतीची
फुटुनी उरी व्यथेने चिडतों असा कशाला ?

घोषीत घोषणांना जाता थवे तयांचे
एकान्त ढाल माझी, दडतों असा कशाला ?

फेसावरी तयांच्या होड्या तरंगताना
पाण्यात खोल येथे बुडतों असा कशाला ?

७४ लाटांवर फेस फेस : मोसम हसण्याचा
रंगांच्या दंगलीत आत्मा घुसण्याचा

शुभ्रशुभ्र उडती हे छेडित नभ पक्षी
ओलेत्या हिरवळीत पाउल फसण्याचा

खळखळती खडकांवर लोलक पाण्याचे
थेंबांतुन इंद्रधनू मोहक दिसण्याचा

अवतीभवती भरली सोनेरी तंद्री
चाफ्यावर श्रावणसर लाडिक रुसण्याचा

झुळझुळत्या वाऱ्याने पैंजणली झाडे
कौलांवर मोर निळा येउन बसण्याचा

होते नुकतेच ऊन, नुकती सर आली
असुनीही नसण्याचा, नसुनी असण्याचा

७८

आज हे आभाळ आहे दाटले
खूप बोलावे तुझ्याशी वाटले

वृक्ष हे घायाळ पक्ष्यांसारखे
प्राक्तनाने पंख ज्यांचे काटले

चालताना खिन्न झाले, थांबले
भासते पाणी अचानक गोठले

भंगलेला धूर कौलारांवरी
वादळाने शीड जैसे फाटले

कापरे निःश्वास तैसे हे दिवे
खोल या डोहात काजळ साठले

मूक हे प्रत्येक येथे पाखरू
आतले गाणे जसे की आटले

सोडिले आहे फुलांनी गाव हे
एकही नाही कुठेही भेटले

७६ या इथे अन् त्या तिथे हे पाहतो मी चेहरे
चेहऱ्यांच्या मागचे हे पाहतो मी चेहरे

हा फुलांचा चेहरा झाकी निखारे पेटले
भर दिसा अंधारणारे पाहतो मी चेहरे

चेहरे हे खोदले अदृश्य पाषाणांतुनी
हे झऱ्यांनी वाहणारे पाहतो मी चेहरे

चेहरे होती दिव्यांनी स्वार अंधारावरी
वादळे हाकारणारे पाहतो मी चेहरे

आर्जवांच्या आड ज्यांचे शोषणाचे मन्सुबे
मतलबी सौदागरांचे पाहतो मी चेहरे

हे यशस्वी थंड डोळे ज्यांवरी थडग्यांपरी
हावरे घोंगावणारे पाहतो मी चेहरे

जवळचे हे दूर होती, जवळ येती दूरचे
चेहऱ्यांविण चेहऱ्यांचे पाहतो मी चेहरे

पैल जाणारे स्वतःच्या भारलेले अवलिये
राख अपुली फुंकणारे पाहतो मी चेहरे

७७ जगण्या भिऊन पळुनी शतदा मरू नका
थडग्यात कागदांच्या कविता पुरू नका

दगडांहुनी फुलांचे जगणे असो कमी
प्राणात गंध राहो, मरण्या डरू नका

नामर्द काळजाला आयुष्य का कळे ?
केल्यापरी गुन्हा हा पेला भरू नका

स्वप्ने कुणी बघो अन् गाणे कुणी म्हणो
कोंडून श्वास त्यांचे विजयी ठरू नका

लखलाभ भेकडांना होवोत ही घरे
कापून पंख तेथे कधिही शिरू नका

स्वप्ने फुलांस पडती ती फूलपाखरे
बाजारभाव आता त्यांचा करू नका

व्यवहार शाहण्यांनो विसरा कधी तरी
या चांदण्यात छत्री धरुनी फिरू नका

शुष्क पानांचा ढिगारा साचला तरिही
हा दिवा मातीत हिरवा लाविला कोणी ?

चेतनेचा अस्त वाटावा· अशी शांती
पेटलेला हा निखारा ठेविला कोणी ?

सर्व या ओसाड निष्ठा, करपली नाती
आर्त हाकेचा मणी हा ओविला कोणी ?

पाहतो सारी भुई उद्ध्वस्त झालेली
मेघ हा येथे कृपेचा वळविला कोणी ?

पाशवी अंधार आहे मातला येथे
कोवळा हा सूर्य तरिही रोविला कोणी ?

फत्तरांचा हा पहारा, हुंदके थिजले
देवकीचा उष्ण पान्हा सेविला कोणी ?

७९ भिउनी चाललो तुझ्यासंगे
पिउनी चाललो तुझ्यासंगे

भवती घोष हिंस्र चक्रांचे
दबुनी चाललो तुझ्यासंगे

कधि तू सूर ते दिले होते
स्मरुनी चाललो तुझ्यासंगे

चिडुनी रोखतात ते डोळे
दडुनी चाललो तुझ्यासंगे

मज माझेच पाय हे शत्रू
जपुनी चाललो तुझ्यासंगे

कळले फक्त हे तुला अश्रू
झरुनी चाललो तुझ्यासंगे

जळलो हे तरी कुणा सांगू ?
झुरुनी चाललो तुझ्यासंगे

मज माझाच शोध लागेना
हरुनी चाललो तुझ्यासंगे

८०

तुला भावलेले आणिक मला भावलेले
चकाकते स्वर हे सारे वर्ख लावलेले

मनांवरी पाट्या येथे 'विकायचे आहे'
जीव तोडुनी बाजारीं सर्व धावलेले

सराईत थोबाडांना रंग थापलेले
फसफसून हसती वरती, आत कावलेले

तुडवितात एकामेका जथे उंदरांचे
पडे मान मोडुन कोणी, कुणा फावलेले

हवेत ही गिरक्या घेती खुषीने गिधाडे
अनायास मुडद्यांचे हे कुरण गावलेले

दिसे फक्त ओरखड्यांचे रान माजलेले
हिंस्र भुकेने स्वप्नांचे ओठ चावलेले

८१ दौडले घोडे असे की सर्व रस्ते कापले
भाजणाऱ्या या उन्हाने वृक्ष सारे रापले

धूर येईना जराही, थंड सारा मामला
शेगड्यांचे कोळसेही या इथे ना तापले

कंठ थिजले पाखरांचे, गाजते कोल्हेकुई
शब्द हे बेवारशी कोणी म्हणेना आपले

घोषणा त्यांनी दिल्या जेव्हा स्मशानाच्या पुढे
ऐकुनी त्या बांधलेले प्रेतही संतापले

येथ सत्तेच्या स्तुतीला बैल म्हातारे उभे
आवरेना लाळ ज्यांना, श्वास ज्यांचे धापले

कापलेली जीभ आहे खूण सत्याची इथे
चेहऱ्यावर आणि ज्याच्या शेण आहे थापले

दार न्यायाचे दिसे हे बंद, टाळे लागले
मागणाऱ्यांनी स्वतःच्या प्राक्तनाला शापले

माणसाचा खून झाला भर उजेडी या इथे
दैनिकांनी सनसनाटी वृत्त आहे छापले

८२ एकटा बरा आहे
येथ मी खरा आहे

संगती नको कोणी
कोवळा झरा आहे

गूज सांगती पक्षी
हासरी धरा आहे

फूलपाखरांची या
लडकी तऱ्हा आहे

शांत या ढगांवरती
रंग साजरा आहे

स्पर्श ते नको त्यांचे
ज्यांवरी चरा आहे

बोलतो स्वतःशी मी
शब्द लाजरा आहे

८३

तू अशी रुसू नकोस, हास एकदा
तूच हासरा झरा दिलास एकदा

थांबलीत सर्व फुले श्वास रोधुनी
उधळ तू मनातला सुवास एकदा

पापण्यांत कोंडिलीस फूलपाखरे
मोकळा करून दे विलास एकदा

चांदणे दिसे पहा मलूल हे कसे
मीच पाहिले असे उदास एकदा

श्रावणातल्या सरी कुणास शोधिती ?
तू विचारुनी पहा उन्हास एकदा

खिन्न खिन्न दाटले धुके सभोवती
संपणार हा कधी प्रवास एकदा ?

या दिशा दिशा तुलाच हाक घालिती
तू भरून दे पुन्हा विकास एकदा

८४

आयुष्य बेहिशोब कसा तोल सावरू ?
येतो चहूकडून कसा पूर आवरू ?

ती आग लागली तिकडे दूर त्या तिथे
डोळ्यांत धूर माझ्या कां लागला भरू ?

प्रत्येक भिंत जाणतसे सत्य आतले
ही लागली म्हणून घरे मौन पांघरू

बागेत मी फुलांच्या होतो इथे उभा
कां आसवें अशी ही मग लागली झरू ?

होडी रुतून आहे रेतीत खोल ही
फिरते विषण्ण भवती हे एक पाखरू

मी सांगण्याचसाठी आलो इथे खरा
शब्दांत फाटक्या या पारा कसा धरू ?

८५ ओठ हे फुटले तरी गाणार आहे
पालखी उचलून मी नेणार आहे

जागजागी बंदुका या रोखलेल्या
पाखरू उडुनी तरी जाणार आहे

कालची ही दैवते विक्रीस आली
मी तरीही हाक ही देणार आहे

मानतो अद्यापही मी माणसाला
हा दिवा हातात मी घेणार आहे

कापला काळोख आहे गल्बताने
शीड तेजाने उद्या न्हाणार आहे

## पहिल्या ओळींची सूची

अजुनी फुले फुलतात ना ! ६४
अपयशाचा हा हिशोब समोर आहे ६३
अवकाश भारलेला, प्राणांत चांदणे १५
आज हे आभाळ आहे दाटले ७५
आलो इथे कशाला माझे मला कळेना १२
आयुष्य बेहिशोब कसा तोल सावरू ! ८४
इथे तरंगत ही फूलपाखरे फिरती ५२
उधळून रंग सारे पूजेस लागली २३
उन्मत्त श्वापदांची आली वरात आली ५५
एकटा बरा आहे ८२
एकदा येईन सजणा, परत मग जाणार नाही ४३
एकान्त एक साथी घेऊन चाललो ३६
ओठ हे फुटले तरी गाणार आहे ८५
कटाक्षांची तिची दुनिया, तिचे ते श्वास मायावी २९
काळीज हे जळाले तरिही पिऊन घेतो ७
कुणी मज पाहिले नाही नजर चुकवून जाताना १०
केला तुरुंग यांनी माझ्या पराक्रमाचा ४१
कोठून पूर येतो, कोठे वहात जातो ५९
कोठून हाक येते, कोठून हे इषारे ! ३४
कोंडिले सारे उमाळे हे असे अधरांत मी ६०
कोण मी यांचा अखेरी आणि माझे काय नाते ! ५४
कोलाहलात साऱ्या माणूस शोधतो मी १
खिन्न या वाटा दूर पळणाऱ्या २
गवतात झाकलेली विजनातली समाधी ६८
गाणी तुझी ओठांतली आता विराया लागली ४९
गाण्यात सर्व माझ्या माझे इमान आहे ५
गात होतो जिंदगीभर मी तुझी गाणी ३०

ग
झ
ल

REFBK-0023325
REFBK-0023325

००

गीत हे गाशील तेव्हा मी जगी असणार नाही ११
गुलाबांची परी जेव्हा जरासे पाहुनी गेली २०
घेउनी सर्वस्व माझे एकदा वहरून जाइन १८
चिडत कां नाहीत इथली माणसे? ५१
जगण्या भिऊनी पळुनी शतदा मरू नका ७७
जडशीळ अशी रात्र, पडे मूर्च्छित वारा ७०
जमलेत सर्व सोदे सौदा इथे कराया ४६
जमाखर्च स्वातंत्र्याचा मांडणार केव्हा? ५३
जाणिले आधीच होते जीव जडताना ७२
डोळ्यांत सांजवेळी आणू नकोस पाणी २५
डोळ्यांवरून माझ्या उतरून रात्र गेली ४
तिने बेचैन होताना कळ्यांनी श्वास टाकावे १९
तुला भावलेले आणिक मला भावलेले ८०
तू अशी रुसू नकोस, हास एकदा ८३
तूच हातांनी तुझ्या हे बंद केले दार ६९
ते दान त्या क्षणाचे घेता मला न आले ४८
ते म्हणाले चेहरे चुकवीत होतो ५८
ते हासतात तेव्हा रडतो असा कशाला? ७३
थंड जरि बाहेर, आतुन पेटलो इतुके पुरे ३५
थोर आपण मानिली ही भ्रष्ट सारी माकडे ५७
दाटुनी येता उदासी कां तुझी मज याद येते? ३८
दौडले घोडे असे की सर्व रस्ते कापले ८१
नसांतुन चंद्रज्योतींनी जळत झडणार आहे मी २२
निरोप घेताना डोळ्यांत आसवे आणणार नाही ४७
पाऊस कोसळे हा, अंधारले दिसे २१
फुलांची पापणी ओली कुणासाठी कुणासाठी? ६
फेसात कोरलेल्या शहरात हिंडलो मी ३९
बागेत अक्षरांच्या जन्मास फूल आले २४
बाजारच्या दिशेने ते सर्व धावले १७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८३४
दा. क्र. २३३२५
काव्य
८१११९
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)



बिंब सूर्यांचे ढगांनी झाकले येथे ७१
बुडणार चंद्र आता, हे संपतील तारे १४
बुल्बुल् मला म्हणाला : आयुष्य हे दिवाणे २६
भाव माझ्या अंतरीचे एकदा कळतील सारे ३
भिउनी चालले तुझ्यासंगे ७९
भीती धरू कशाला जर जायचेच आहे २८
माझ्या घरात भिक्षा मी मागणार नाही २७
माझ्याच भावनांना मज जाळता न येते ३२
माझ्या सुरात माझा मी प्राण ओतला १३
मी दिला आवाज येथे लाभली पण साथ नाही ५६
मी निघालो, दार तूही लाव आता ५०
मी फुले ही वेचताना सांज झाली १६
यशाला घालिती माला, यशाचे सर्व देव्हारे ३१
या कागदी फुलांच्या पडद्यावरील बागा ४२
या इथे अन् त्या तिथे हे पाहतो मी चेहरे ७६
रंगांस या स्वरांनी मी गुणत राहिलो ६६
रात्र आहे वादळी, वारा पिसा सैराट आहे ४४
लाटांवर फेस फेस : मोसम हसण्याचा ७४
वाट होती आंधळी अन् भोवती अंधार होता ९
शपथ माझ्या जिवाची, शपथ साऱ्या जिण्याची ६२
शुष्क पानांचा ढिगारा साचला तरिही ७८
संपवोनी बाल्य माझे दुःख झाले जाणते ४०
सारे मला मिळाले काही न मागता ८
सावल्यांचा काफिला हा चालला आहे कुठे ? ४५
हा आरसा असा मी कोठून आणला ! ६१
हे खरे की खूप माझे हाल झाले ६५
हे वेगळेच रस्ते, ही वेगळीच नाती ६७
होय तू म्हटलेच नाही जाणतो मी ३७
क्षितिज हे वेड्या फुलांनी सांजवेळी पेटलेले ३३

ग
झ
ल

००



**मंगेश पाडगांवकर यांची पुस्तके**

धारानृत्य १९५० • जिप्सी १९५३, १९५९, १९६५, १९६८, १९७२ • छोरी १९५७ • निंबोणीच्या झाडामागे १९५४, १९५८ • शर्मिष्ठा १९६० • उत्सव १९६२ • वात्रटिका १९६३ • भोलानाथ १९६४ • मीरा १९६५ • विदूषक १९६६ • बबलगम १९६७ • सलाम १९७८, १९८१ • गझल १९८१